नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/01/2024 (सोमवार) सायंकाळ

---

## नागपूर पोलीस दलात डीपीडीसी अंतर्गत नवीन ११ स्कॉर्पिओ दाखल

## माननीय उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणविस यांनी हिरवा झेंडा दाखवुन नागपूर ग्रामीण पोलीस दलास केल्या सुपूर्द.

नागपुर ग्रामीण पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पायाभूत सुविधा पुरविणे CLOSE CIRCUIT TELEVISION संनिरीक्षण यंत्रणा व ईतर उपयुक्त तंत्रज्ञान पुरविणे तसेच पोलीस दलाकडुन नागरीकांना जलद प्रतिसाद मिळणे, पोलीस दलाचे आधुनिकीकरण करणे जिल्हयातील प्रत्येक पोलीस स्टेशन अंतर्गत आपले पोलीस ही संकल्पना आणणेकरीता, वाहतुक व्यवस्थेचे बळकटीकरण करणे तसेच त्याकरीता दुचाकी आणि चारचाकी वाहने खरेदी करणे या योजनेखाली नागपुर ग्रामीण पोलीस दलाचे आस्थापनेवर जिल्हयामध्ये दौऱ्यावर येणाऱ्या मंत्रीमडळातील माननीय सदस्य, वरीष्ठ अधिकारी, व्ही. व्ही. आयपी यांचे पायलट व एस्कॉर्ट करीता सन २०२३–२४ या वित्तीय वर्षात जिल्हा नियोजन समीती कडुन नागपुर ग्रामीण पोलीस दलासाठी १० महिन्द्रा स्कॉर्पिओ व न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा नागपुर यांचेकरीता ०१ स्कॉर्पिओ अशी एकुण ११ स्कॉर्पिओ N Z4 चारचाकी वाहने खरेदी करण्यात आलेली आहेत.

नागपूर पोलीस दलात डीपीडीसी अंतर्गत नवीन ११ स्कॉर्पिओ दाखल सदर कार्यक्रम दिनांक ०१/०१/२०२४ रोजी वसंतराव देशपांडे सभागृह सिव्हील लाईन नागपूर परिसरात पार पाडला. यावेळी **माननीय उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री. देवेंद्र फडणीस** यांनी हिरवा झेंडा दाखवून डीपीडीसी अंतर्गत ११ नवीन स्कॉर्पिओ नागपूर ग्रामीण पोलीस दलास सुपूर्द केल्या, सदर कार्यक्रमास मा. खासदार श्री. कृपालजी तुमाने, मा. आमदार श्री. आशिष जयस्वाल, मा. जिल्हाधिकारी नागपूर डॉ. विपीन इटनकर हजर होते. याबद्दल नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार यांनी याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले आहेत.






 

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**